क्र. पोमसं/२/१०२०/निनिसू/२०१६-१७/२७८/२०१६ मुंबई, दिनांक १८/८/२०१७

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/१३/२२/आदेश अंमलबजावणी/१२५/ २०१७, दिनांक १२/०७/२०१७

**विषय:-** शिस्तभंगविषयक प्रकरणांमध्ये देण्यात आलेल्या अंतिम शिक्षेबाबतच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

----ooo----

**परिपत्रक :-**

उपरोक्त विषयास अनुसरून या कार्यालयाने संदर्भाधिन परिपत्रकान्वये घटक कार्यालयाना या पुर्वीच कळविले आहे. की, शिस्तभंगविषयक कार्यवाहीनंतर शिक्षेबाबतचे अंतिम आदेश निर्गमित झाल्यानंतर सदर शिक्षेची अंमलबजावणी करणे. त्या शिक्षेची नोंद सेवापुस्तक/सेवापटात घेणे याबाबतची जबाबदारी संबंधीत घटक प्रमखांची आहे.

२. तथापि, असे निर्दशनास आले की, पोलीस अधिकारी यांना वेतनवाढ/ दंड किंवा अन्य शिक्षा ही अंतिम आदेशात दिल्यांनतर त्या शिक्षेची लागलीच अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही बऱ्याच वेळेस पोलीस अधिकारी यांच्या शिक्षेची अंमलबजावणी न केल्यामुळे पदोन्नतीस पात्र ठरून देखील पदोन्नती मिळत नाही. किंवा कोर्टात केसचा निकाल त्यांच्या बाजूने लागतो किंवा घटक कार्यालयातील प्रशासकिय अनियमितता त्यास कारणीभूत ठरून पोलीस अधिकाऱ्यांना पदोन्नती देताना प्रशासकिय अडचणी निर्माण होतात, व पोलीस अधिकारी पदोन्नती पासून वंचित राहतात.

३. शासनाने याबाबत त्यांचे पत्र क्र रापोसे ०११६/प्र.क्र. १८९ (भाग-२) / पोल-१अ, दिनांक १०/८/२०१७ अन्वये कळविले आहे की, शासकिय अधिकारी /कर्मचारी यांच्या शिक्षेबाबतचे आदेश निर्गमित झाल्यानंतर, सक्षम प्राधिकारी यांनी सदर शिक्षेस स्थगिती दिल्याशिवाय, सदर शिक्षेची अंमलबजावणी न करणे योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे सदर शिक्षेची अंमलबजावणी मागील दिनांकास दर्शवून, त्याची वेतन पुन:स्थापना करणे व त्यांच्याकडून एका वेतनाएवढया रक्कमेची वसुली करण्याबाबतची तरतूद संबंधीत नियमामध्ये नाही.

४. तरी शासनाने दिलेल्या वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच, शिक्षेच्या अंमलबजावणीस टाळाटाळ / दिरंगाई करणाऱ्या संबंधीत कर्मचाऱ्याच्या बाबतीत यापुढे जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचे करिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).

अपर पोलीस महासंचालक (का. व सु), मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे / प्रशिक्षण व खास पथकें, म. राज्य, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, मुंबई

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

इतर सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, मुंबई/ फोर्स वन, मुंबई/(नविअ) नागपूर.

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधिक्षक (लोहमार्गसह)

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें

प्रत सस्नेह अग्रेषित:-

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.

प्रत माहितीकरिता व सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन पोल १अ, मंत्रालय, मुंबई (शासनाचे क्र. रापोसे-०११६ /प्र.क्र. १८९ (भाग-२) पोल १अ, दिनांक १०/८/२०१७ च्या पत्रास अनुसरून)

प्रत:-

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. प्रस्तुत परिपत्रक या लेखा शिर्षाखाली पुढील कायम स्वरूपी प्रसिध्द करावे.